बुधवार, दि २३ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पत्रकार कार्यशाळेचे उदघाटन

## जालन्यातील पत्रकारांना सामाजिक बांधीलकी; एआयचा वापर आणि सत्यतेची पडताळणी आवश्यक - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

कार्यशाळेत प्रा. संदीप काळे आणि श्रीमती प्रणाली तायडे यांचे बहुमुल्य मार्गदर्शन







**जालना । प्रतिनिधी -** गेल्या दोन वर्षांपासून जालना जिल्ह्यातील पत्रकारांना मी पाहतो आहे. येथे मोठ मोठी आंदोलने झाली, लोकसभा-विधानसभा निवडणुका झाल्या. येथील पत्रकारांनी वस्तुस्थिती मांडण्याचे काम केले. सकारात्मता पसरलेल असे वृत्त दिले. येथील पत्रकारांना सामाजिक बांधीलकी असल्याचे सांगत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जालना जिल्ह्यातील पत्रकारांची पाठ थोपाटली. त्याच बरोबर पत्रकारितेत एआयचा वापर होत असून एआय समजून घेणे आवश्यक असल्याचेही डॉ. पांचाळ यांनी म्हटले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सभागृहात मंगळवार (दि २२) रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने जिल्हास्तरीय पत्रकार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ हे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम. अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार तर प्रमुख मार्गदर्शक जालना येथील शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे संगणक विभागाचे वरिष्ठ श्रेणी प्राध्यापक प्रा. संदिप काळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील (संगायो) विभागाच्या तहसिलदार श्रीमती प्रणाली तायडे आणि जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, एआय आणि मोबाईलच्या युगात गावातील मुले देखील ब्रेकींग न्यूज करत आहेत. प्रत्येकाला आज बातमी लवकरात-लवकर हवी असते. परंतू कोणतीही बातमी प्रसिध्द करण्यापुर्वी पत्रकारांना त्याची सत्यता देखील पडताळून पाहणे आवश्यक आहे. आज मोबाईल आणि एआयच्या युगामध्ये प्रत्येकाकडे बातमी असून, प्रत्येक व्यक्ती हा बातमीचा कन्टेंट तयार करु शकतो. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापर करणे आवश्यक आहे. कृत्रिम पान २ वर

### प्रा. संदीप काळे यांचे मुद्दे

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे काय?
मशीनद्वारे मानवासारखे विचार, निर्णयक्षमता व कृती.
पत्रकारितेमधील AI चा उपयोग
फेक न्यूज शोधणे, लेखन सहाय्य, ट्रेंड विश्लेषण, भाषांतर.
एआयचे फायदे आणि धोके
माहितीचा वेगाने प्रसार vs खोट्या बातम्यांचा धोका.
**सायबर गुन्हेगारीचे प्रकार**
सोशल मीडिया हॅकिंग, फिशिंग, डेटा चोरी, बनावट प्रोफाईल.
**पत्रकारांनी घ्यावयाची काळजी**
सशक्त पासवर्ड, टू-फॅक्टर ओथेंटिकेशन, सुरक्षित ईमेल व्यवहार.
**सायबर कायदे व पत्रकारांचे अधिकार**
आयटी ॲक्ट, फौजदारी कलमे, डिजिटल हक्क.

### प्रणाली तायडे यांचे मुद्दे

**ताणतणाव म्हणजे काय?**
मानसिक, शारीरिक आणि भावनिक दडपणाची अवस्था.
पत्रकारिता क्षेत्रातील ताणाचे प्रमुख कारणे
वेळेचे बंधन, संवेदनशील बातम्या, अपुरी विश्रांती, स्पर्धा.
ताण ओळखण्याचे लक्षणे
झोपेचा अभाव, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव, मानसिक थकवा.
ताणतणाव कमी करण्याचे उपाय
श्वसनाची साधी तंत्रे, ध्यान, नियमित व्यायाम, संवाद.
व्यक्तिगत वेळ व प्रोफेशनल जीवन यामध्ये समतोल राखण्याचे महत्त्व.
**प्रणाली तायडे यांनी हसतखेळत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मार्गदशन केले.**

## सिंगोना ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक यांचा मनमानी कारभार सुरू

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील सिंगोना येथील उपसरपंच, तानाजी आबासाहेब सोळंके यांनी पंचायत समितीचे मा.गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात म्हटले सिंगोना ग्रामपंचायत येथील ग्रामसेवकांची बदली करण्यात यावी.सिंगोना ग्रामपंचायत कार्यरत असलेले ग्रामसेवक यांना गावा विषयी काहीही माहिती विचारली असता देण्यास नकार देतात.त्यात त्यांना परभणी येथुन सकाळी अकरा ते बारा वाजता परतूर ला येतात. नंतर दुपारी तीन वाजता परभणी ला निघून जातात त्यांना अपडावून मुळे वेळच मिळत नाही.ऑफिसीयल ड्युटी असल्याने त्यांना आमच्या सिंगोना गावाला व गावातील नागरिकांच्या कामासाठी वेळच मिळत नाही.वेळेवर कधी हजर रहात नाहीत. ग्रामसेवक यांना माहिती मागितल्यास माहिती देणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा अशा शब्दात परत आम्हाला धमकी देण्यात येत आहे.यांचा मनमानी कारभार सुरू आहे.यामुळे त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी सिंगोना येथील उपसरपंच तानाजी सोळंके व गावकऱ्यांच्या वतीने बदली ची मागणी करण्यात येत आहे.

## रुग्णांना उच्च दर्जाची आरोग्य सेवा देण्यासाठी प्रयत्नशिल

सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. मोतीबिंदू आजारावर मात करण्यासाठी या अभियानाचा प्रचार, प्रसार झाला पाहिजे. त्यासाठी सर्व आरोग्य विभाग तत्पर राहील. रुग्णांना उच्चतम दर्जाची आरोग्य सुविधा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर यांनी केले.

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानाअंतर्गत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दि.२२ जुलै २०२५ रोजी करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन कानोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी जयश्री भुसारे, जिल्हा शल्य चिकित्सक राजेंद्र पाटील आदि उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, जिल्हा सामान्य रुग्णालयात मोतीबिंदू कक्षाचे उद्घाटन माझ्या हस्ते करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै ते २२ ऑगस्ट दरम्यान पान २ वर



# संपादकीय

## पत्रकार सशक्तीकरणाची सुरुवात

### जालना जिल्हा माहिती कार्यालयाचा अनुकरणीय उपक्रम

माहितीचा विस्फोट होत असलेल्या या काळात पत्रकारिता केवळ घटना नोंदविण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती सामाजिक, तांत्रिक आणि मानसिकदृष्ट्याही अधिक जबाबदारीची आणि आव्हानात्मक बनली आहे. अशा पार्श्वभूमीवर, जालना जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने नुकतीच आयोजित करण्यात आलेली कार्यशाळा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सायबर गुन्हेगारी आणि ताणतणाव व्यवस्थापन या अत्यंत सुसंगत व महत्त्वपूर्ण विषयांवर केंद्रित होती, ही केवळ एक औपचारिकता नव्हती, तर पत्रकारांच्या व्यावसायिक क्षमतेच्या सशक्तीकरणासाठीचा ठोस टप्पा होता.

**नवीन माहिती अधिकाऱ्यांचा नवा दृष्टिकोन**

या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी यांनी घेतलेला सक्रिय पुढाकार. वरिष्ठ पातळीवरील आदेशाच्या चौकटीत अडकून न पडता, त्यांनी या कार्यक्रमाला केवळ कागदोपत्री फाईल न ठेवता, ती एक विचाराची, संवादाची आणि समृद्धीची वाट करून दिली. मागील काही अधिकाऱ्यांनी अशा आदेशांचे पालन फक्त तालुका पातळीवर छोटेसे कार्यक्रम घेऊन केले होते. मात्र यावेळी जिल्हाभरातील पत्रकारांना एकत्र करून, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलावून व्यासपीठ निर्माण करणे ही सशक्त भूमिका होती.

**तांत्रिक सजगतेची आवश्यकता**

आजचा पत्रकार मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल टूल्स वापरतो. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर गुन्हेगारी यांसारख्या विषयांवरील सखोल समज ही केवळ माहितीपुरती बाब राहिलेली नाही. चुकीची माहिती, फेक न्यूज, सायबर हल्ले आणि डेटाची गोपनीयता यांसंदर्भात पत्रकार सजग असणे ही समाजासाठीही अनिवार्य गरज बनली आहे.

एआयच्या साहाय्याने तयार होणारी बनावट प्रतिमा, आवाज किंवा माहिती हे केवळ तांत्रिक प्रश्न नसून पत्रकारितेच्या विश्वसनीयतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे घटक आहेत. त्यामुळे अशा विषयांवरील साक्षरता ही काळाची गरज आहे - आणि तीच या कार्यशाळेने प्रभावीपणे पूर्ण केली.

**मानसिक आरोग्य - दुर्लक्षित पण मूलभूत घटक**

आज पत्रकार एका सतत धावपळीच्या, तणावपूर्ण आणि अस्थिर वातावरणात कार्य करत असतो. अपघात, हिंसाचार, राजकीय संघर्ष, भ्रष्टाचार अशा घटनांचे वारंवार वार्तांकन करताना मानसिक आरोग्याचे जतन हे त्यांच्यासाठीही तितकेच आवश्यक आहे. ताणतणाव व्यवस्थापनावर विशेष सत्र घेणे हे या कार्यशाळेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. हे दुर्लक्षित पण अत्यावश्यक क्षेत्र प्रशासनाने ओळखले, ही बाब केवळ अभिनंदनीय नव्हे तर इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायी ठरावी अशी आहे.

**उपक्रमांचा प्रभाव दीर्घकालीन असावा**

कार्यशाळा संपली की विषय संपतो - ही आजवरची रूढ मानसिकता. मात्र या कार्यशाळेचा उद्देश आणि उपक्रमांची खोली लक्षात घेता, या कार्यक्रमाचा फॉलो-अप, रिफ्रेशर सेशन्स, ऑनलाईन कोर्सेस किंवा एआय आधारित पत्रकारितासाठी कार्य असे पुढच्या पायऱ्याही जिल्हा माहिती कार्यालयाने विचारात घ्याव्यात, अशी अपेक्षा करता येईल.

**नवीन पायंडा - नवीन दिशा**

या कार्यशाळेमुळे एक गोष्ट निश्चित ठरते - प्रशासन आणि माध्यमे जर एका सकारात्मक उद्दिष्टासाठी एकत्र आली, तर समाजासाठी उपयोगी आणि दिर्घकालीन बदल शक्य आहेत. जालना जिल्हा माहिती कार्यालयाने दिलेले हे उदाहरण हे राज्यातील इतर जिल्ह्यांना एक नवा पायंडा आणि दिशा दर्शवणारे ठरेल.

उपक्रम हे केवळ आदेशाचे पालन नसून, जबाबदारीची जाणीव असावी लागते; हे जालना जिल्ह्याच्या या उपक्रमाने दाखवून दिले आहे.

पत्रकारांना सक्षम करणे म्हणजे समाजाच्या चौथ्या स्तंभास भक्कम करणे. आणि समाज भक्कम होण्यासाठी अशीच कार्यशाळा, अशीच दृष्टी आणि असेच नेतृत्व आवश्यक आहे.

## आनंदी जीवनासाठी समतोल आवश्यक - देवेंद्र भुजबळ

**नवी मुंबई । प्रतिनिधी** - खरा आनंद कोणत्या गोष्टीत आहे, हे शोधून आनंद मिळवा. मात्र तो आनंद दुसऱ्याच्या दुःखाचे कारण ठरू नये आणि व्यसनात रूपांतर होऊ नये, यासाठी जीवनात समतोल राखणे अत्यावश्यक आहे, असे मत निवृत्त माहिती संचालक श्री देवेंद्र भुजबळ यांनी व्यक्त केले.



सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित आनंदी जीवनाची गुरुकिल्ली या विषयावर नुकतेच भुजबळ यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले.

या वेळी बोलताना त्यांनी सांगितले की, खाणे, मोबाईलचा वापर, अथवा इतर व्यसनांमधून काहींना तात्पुरता आनंद मिळतो. मात्र तो सतत चालल्यास तो शरीर आणि मन दोहोंसाठी घातक ठरतो. त्यांनी मधुमेह तज्ज्ञ डॉ. विनायक हिंगणे यांच्या क्रेव्हिंगः खाण्याचे व्यसन या पुस्तकाचा संदर्भ देत सांगितले की, अति खाणे हे देखील व्यसन असून, त्यावर नियंत्रण आवश्यक आहे.

श्री भुजबळ पुढे म्हणाले, आपले जीवन संतुलित ठेवण्यासाठी योग, व्यायाम, ध्यानधारणा, पुरेशी झोप, छंद, सकारात्मक नातेसंबंध आणि सामाजिक सहभाग या सर्व घटकांचे महत्त्व अधिक आहे. आज तांत्रिक आणि आर्थिक प्रगती भरभराटीत असली तरी सामाजिक, भावनिक आणि मानसिक संतुलन ढासळत चालले आहे, असे निरीक्षण नोंदवत त्यांनी मोबाईलच्या अति वापरावरही स्पष्ट इशारा दिला - मोबाईल हा मित्रही आहे आणि शत्रूही, त्याचा वापर आपल्या विवेकावर अवलंबून आहे. निवृत्तीनंतरचा काळ सृजनशीलतेने, छंद वृद्धिंगत करून आणि सामाजिक कामात सहभाग घेत सकारात्मक बनवण्याचेही त्यांनी आवाहन केले.

दुःख वाटले तर कमी होते, पण आनंद वाटला तर तो वाढतो. त्यामुळे नेहमी इतरांना आनंद देण्याचा प्रयत्न करा, तुम्हालाही निश्चित आनंद मिळेल, असा संदेश त्यांनी शेवटी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मारुती कदम, सूत्रसंचालन शरद पाटील यांनी केले तर बळवंतराव पाटील यांनी आभार मानले. पोर्ट ट्रस्ट कामगार अंकाचे कार्यकारी संपादक मारुती विश्वासराव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास संघाचे पदाधिकारी, मान्यवर आणि मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## बिहार मधील ५१ लाख नावे मतदार यादीतून हटवली

**नवी दिल्ली** - बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगानं मतदार यादीचं स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजन अभियान सुरु केलं आहे. निवडणूक आयोगानं एसआयआरद्वारे ५१ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून हटवली आहेत. आयागोनं यासंदर्भातील माहिती दिली आहे. निवडणूक आयोगानं एसआयर मध्ये १८ लाख नावं मृत मतदारांची आढळून आल्याचं म्हटलं. त्याशिवाय २६ लाख मतदार बिहारच्या बाहेर किंवा इतर मतदारसंघात स्थलांतरित झाले आहेत. त्यामुळं त्यांची नावं हटवण्यात आली आहेत. याशिवाय ७ लाख मतदारांची नावं दोन ठिकाणी नोंदवली गेल्यानं ती हटवण्यात आली आहे. नियमानुसार एकाच मतदारसंघात नाव नोंदवता येतं. मात्र, नियमांचं उल्लंघन केल्यानं ही नावं हटवली गेली आहेत. म्हणजेच एकूण ५१ लाख नावं बिहारच्या मतदार यादीतून हटवण्यात आली आहेत.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार बिहारमध्ये ७.८९ कोटी नोंदणीकृत मतदारांपैकी ९७.३० टक्के मतदारांनी Enumeration Forms जमा केले आहेत. या फॉर्मची गरज १ ऑगस्ट २०२५ ला प्रकाशित होणाऱ्या प्राथमिक मतदार यादीत नावाचा समावेश आवश्यक आहे.

पान १ वरुन

## जालन्यातील पत्रकारांना ...

बुद्धिमत्ता (एआय) पत्रकारितेवर अनेक प्रमुख मार्गांनी परिणाम करत आहे. त्यामुळे एआयचा वापर कशा प्रकारे करावा हे पत्रकारांनी समजावून घेणे आवश्यक आहे. प्रत्येक क्षेत्रात एआयचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्यामुळे पत्रकारांनी देखील नवीन येणारे तंत्रज्ञान आत्मसात करणे ही आज काळाची गरज बनली आहे.

तसेच आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये आपणा सर्वांना विविध ताण-तणावांना सामोरे जावे लागत आहे. याकरीता आज आपणास जिल्हा माहिती कार्यालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या माध्यमातून दोन महत्वाच्या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन मिळणार असुन, या प्रशिक्षणाचा आपणास नक्कीच आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग होणार असल्याचे ही डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले.

पोलीस अधिक्षक श्री. बन्सल मार्गदर्शन करतांना म्हणाले की, एआयचा वापर चांगल्यारितीने केल्यास त्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात निश्चितच फायदा होणार आहे. सध्या पत्रकारितेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा पैसा आणि वेळ वाचविण्यासाठी होत असून, वेग आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी देखील त्याचा उपयोग केला जात आहे. नियमित रिपोर्टिंग स्वयंचलित करून, येणाऱ्या समस्या जलद गतीने कमी करून कृत्रिम बुद्धिमत्ता सद्याच्या पत्रकारितेवर परिणाम करत आहे. परंतु एआयचा वापर करतांना पत्रकारांनी बातमीची खात्री करुन घेणे देखील आवश्यक आहे .

**कार्यशाळेत प्रा. संदीप काळे आणि श्रीमती प्रणाली तायडे यांचे बहुमुल्य मार्गदर्शन**

माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजीत पत्रकार कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक जालना येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे संगणक विभागाचे वरिष्ठ श्रेणी प्राध्यापक प्रा. संदीप काळे यांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारीता, सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. तर तहसिलदार (संगायो) श्रीमती प्रणाली तायडे यांनी ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर पत्रकारांना बहुमुल्य मार्गदर्शन केले.

प्रा. काळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पत्रकारीतेमध्ये कशा पध्दतीने वापर करावा. तसेच सायबर सुरक्षा, डिपफेक, व्हिडिओ एडिटींग करणे, व्हिडिओ-ऑडीओ मजकूर रुपांतरीत करणे, भाषांतर, सादरीकरण तयार करणे, विविध अहवाल तयार करणे, ग्राफिक्स डिझाईन, विविध भाषेचा योग्य वापर आणि सायबर सुरक्षा आदी बाबत यावेळी मार्गदर्शन केले.

तसेच तहसिलदार प्रणाली तायडे ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये आपणास विविध ताण-तणावांना सामोरे जावे लागते. बदलते कामाचे स्वरूप, बदलती कुटूंब रचना, समाजामध्ये वावरण्याचे बदलेले नियम आणि सोशल मिडिया या सर्वांचा परिणाम आपल्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर होत आहेत. या वाढत्या ताण-तणावावर आपण नियंत्रण आणणे आवश्यक आहे. त्यासाठी ताण-तणावांचे योग्य व्यवस्थापन करुन आपल्या जीवनशैलीत योग्य बदल घडविल्यास आयुष्य आनंदाने जगता येते.

जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी यावेळी माहिती जनसंपर्क महासंचालनालय विभागामार्फत पत्रकारांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. यामध्ये अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या योजनेचे पात्रता, निकष आणि आवश्यक कागदपत्रे याविषयी माहिती दिली.

कार्यशाळेचे प्रास्ताविक जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी केले. तर मिलींद तुपसमिंद्रे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तसेच उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातील विष्णु जायभाये, संतोष पाखरे, श्रीमती प्रतिभा इंगळे, ज्ञानोबा पांचाळ यांनी सहकार्य केले. यावेळी कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व पत्रकार, वृत्तपत्र प्रतिनिधी, संपादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्णांना उच्च ...

राज्यभरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यात मनोरुग्णालयाचे काम प्रगतीपथावर असून ते लवकरच कार्यान्वित होईल.प्रत्येक रुग्णाला उच्चतम सुविधा देण्यासाठी आरोग्य विभाग तत्पर राहील. असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# दाटलेल्या उत्सुकतेला आनंदाची झालर!

## ३८ वर्षानंतर फार्मसिस्ट मित्रांचे 'गेट - टुगेदर' थाटात संपन्न



**जालना । प्रतिनिधी** - गेवराई तालुक्यातील गढी येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या फार्मसिस्ट मित्रांचे गेट टुगेदर थाटात संपन्न झाले. तब्बल ३८ वर्षानंतर भेटलेल्या मित्र मैत्रिणींनी दाटलेल्या उत्सुकतेला आनंदाची झालर लावली. यामुळे हा स्नेहमेळावा अविस्मरणीय क्षणांचा संस्मरणीय सोहळा ठरला.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बोरूडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य राम महासाहेब, व त्यांच्या सौ. सीता महासाहेब, प्रा.दिलीप जोशी व त्यांच्या सौ., प्रा.रेवणवार, प्रा.टाक, प्रा. क्षीरसागर, प्रा धस, प्रा. तोरणेकर, प्रा. आदींची यांची उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले. स्नेहमेळाव्याला राज्यातील बीड, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, परभणी, जालना आदी जिल्ह्यांतून तत्कालीन विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. याप्रसंगी गुरूजनांचे आदरातिथ्य, व स्मृतिचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आले. उपस्थित सर्वांना स्व परिचय व्यक्त करण्याची संधी मिळाली. प्रास्ताविक फार्मा व्यावसायिक प्रमोद तोतला यांनी तर सूत्रसंचालन सुभाष जगताप यांनी केले. संजय बोबडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री प्रमोद तोतला, मंगेश वाणी, संजय बोबडे, बाळासाहेब पांढरे, प्रदीप बाप्ते, सुभाष जगताप, अंबादास क्षीरसागर, भाऊसाहेब आंधळे, सोमनाथ लाहोटी, शोभा राऊत, उर्मिला कानगावकर, मनिषा गुरेले आदींनी पुढाकार घेतला.

प्रास्ताविक सादर करताना प्रमोद तोतला यांनी या या गेट-टुगेदर आयोजना विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की मी ठोक औषधी व्यवसायात आल्यामुळे जालना जिल्ह्यातील गढी येथे शिक्षण घेऊन व्यवसायात आलेल्या सर्वांच्या संपर्कात आहे .परंतु संपूर्ण महाराष्ट्रातील जे आपले मित्र आहे ते एक दुसऱ्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात नाहीत .एक दुसऱ्यांची माहिती होणे तसेच सध्या ते काय करत आहेत? परिवार कसा आहे? त्यांच्या काही अडचणी आहेत का? याविषयी एकमेकांना माहिती असावी आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. गढी येथील कॉलेजमध्ये आम्ही घालवलेला वेळ हा आमच्या आयुष्याला वळण देणारा काळ ठरला. डी फार्मसी च्या शिक्षणानंतर आम्ही बरेचसे मित्र औषधी व्यवसायात आलो. कुणी अन्य व्यवसाय निवडले परंतु आयुष्याला एक चांगले स्वरूप प्राप्त झाले .आम्हाला ज्यांनी विद्यादान दिले ते सर्व प्राध्यापक व तत्कालीन सर्व कर्मचारी यांचे आम्ही सर्व अत्यंत आभारी आहोत आमचा तो कार्यकाळ दहावीनंतर दोन वर्ष म्हणजे काही फार समजदारीचा नव्हता. जे काही संस्कार आमच्यावर घडले ते सर्व या गढी येथील फार्मसी कॉलेजच्या शिक्षणामुळेच घडले. यावेळी सर्व माजी प्राचार्य राम महासाहेब,प्रा दिलीप जोशी, प्रा.रेवणवार तसेच सध्या कार्यरत प्रा.बोरुडे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सर्वांना चहापाणी नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर सउत्साह उसळून वाहत होता.

## सौर ऊर्जा प्रकल्पाची दलित आदिवासी जमिनीत बळजबरी उभारणी केल्यास तीव्र आंदोलन छेडू - ॲड. भास्कर मगरे



**अंबड । प्रतिनिधी** - राज्य शासनाकडून सध्या सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याचे धोरण आहे, या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी दलित आदिवासींची जमिनी बळकावून त्यावर उभारणी केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा शिवसेना दलित आघाडीचे ॲड. भास्कर मगरे यांनी दिला आहे. ते सोमवार (दि २१) रोजी आयोजित अंबड-घनसावंगी तालुकास्तरीय दलित आदिवासी कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

यावेळी अण्णासाहेब बाळराज, विलासराव खरात आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना ॲड. मगरे म्हणाले की, शिवसेना दलित आघाडी गेले अनेक वर्षांपासून दलित आदीवासी कास्तपट्टेनावावर करण्यासाठी आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करीत आहोत. महाराष्ट्र शासनाचा उर्जा प्रकल्प उभारणी सध्या सुरु आहे. शासनाचे धोरण पडीत व खडकाळ जमिनीवर सौर उर्जा प्रकल्प राबविण्याचे धोरण आहे, मात्र, प्रशासकीय स्तरावर दलित आदिवासी वहिती मशागत केलेल्या उभे पिकांत सौर उर्जा प्रकल्पाची उभारणी करीत आहेत. यास शिवसेना दलित आघाडीचा तीव्र विरोध असल्याचे ॲड. मगरे म्हणाले. गेल्या महिनाभरापासून जालना जिल्ह्यात शिवसेना दलित आघाडीच्यातवीने जनजागृती करण्याचे काम सुरु आहे. पोलीसांमार्फत प्रशासन दलित आदिवासी कास्तकरांना धमकावण्याचे काम करीत आहे. मात्र, त्याला आम्ही घाबरत नाही. वेळप्रसंगी सरकारच्या विरोधात जाऊन आंदोलन करण्याची भूमिका आपली असल्याचेही ॲड. मगरे यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी मोठ्या संख्येने दलित आदिवासींची उपस्थिती होती.

## हरमनप्रीत कौरचे दणदणीत शतक

भारताची महिला कर्णधार हरमनप्रीत कौरने दणदणीत शतक झळकावलं आहे. इंग्लंडविरूद्ध सुरू असलेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात हरमनप्रीतने सातवं आंतरराष्ट्रीय शतक झळकावलं आहे. हरमनने ८२ चेंडूत १४ चौकारांसह १०२ धावा करत शतक आपल्या नावे केलं. हरमनप्रीत कौरच्या शतकासह भारताने वनडे सामन्यात ३०० धावांचा पल्ला गाठला आहे.

भारताचा महिला क्रिकेट संघ इंग्लंड दौऱ्यावर आहे. यादरम्यान दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० आणि ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवली गेली. भारतीय महिला संघाने ४-१ च्या फरकाने टी-२० मालिका आपल्या नावे केली आहे.

# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे.चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली. अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते. परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले.तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमिच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते. दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता,



एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले. आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले.अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/ अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता.आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण, भ्रष्टाचार,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना करावा लागतो आहे.आज १४० करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.यामुळे हा पैसा १४० कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत.यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आत्मस्वरूपाची जाणीव म्हणजेच जीवनाची सार्थकता

## नारायण महाराज पिंपळे काळेगावकर यांचे प्रतिपादन



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** बाह्य उपाध्या व कीर्ती देहासोबत नष्ट होतात, परंतु आत्मस्वरूपाची जाणीव झालेल्याचे जीवन खरेच सार्थकी लागते, असे प्रतिपादन कीर्तनकार नारायण म हाराज पिंपळे काळेगावकर यांनी केले.

येथील संत सावता मंगल कार्यालयात सुरू असलेल्या हरिनाम सप्ताह अंतर्गत, संत सावता माळी पुण्यतिथी निमित्त आयोजित कीर्तनात ते शनिवारी रात्री बोलत होते.

महाराजांनी संत निळोबारायांच्या उपाधीचा उबग आला... या अभंगाचे सविस्तर निरुपण करत भक्तीचा खरा अर्थ उलगडला. जेव्हा देहभाव व अभिमान नष्ट होतो, तेव्हाच खरी भक्ती साकार होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी संत सावता महाराज यांच्या अंतःकरणातील भगवंताचे वर्णन करत प्रत्येकाच्या हृदयातच परमात्मा वास करतो, असे सांगत आत्मज्ञानाच्या महत्त्वावर भर दिला. कीर्तनाच्या वेळी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली जाधव यांनी मृदुंगाची तर दगडोबा खलसे, कृष्णा महाराज सुरडकर, मुकुंद महाराज शेडगे, विठ्ठल महाराज कापसे, गजानन महाराज भुतेकर यांनी गायन व वादनाची संगत दिली. कार्यक्रमासाठी टेंभुर्णी व परिसरातील महिला-पुरुष भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या जन्मदिनी घनसावंगीत शेकडो कार्यकर्त्यांचे रक्तदान



**घनसावंगी । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रेरणेतून संपूर्ण महाराष्ट्रभर महा रक्तदानाचा संकल्प राबविण्यात आला. देवेंद्रजींचा वाढदिवस 'उत्सव' म्हणून नव्हे तर 'उत्तरदायित्व' म्हणून साजरा करत, घनसावंगी विधानसभा मतदारसंघात समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीनही मंडळात भव्य रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरात २२८ भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत सामाजिक जबाबदारी निभावली.

घनसावंगी तालुक्यात समृद्धी साखर कारखाना येथे भाजपा तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम उढाण यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. रांजणी (जालना ग्रामीण) येथे मंडळ अध्यक्ष संजय आटोळे यांनी उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. तर शहागड येथे तालुका प्रम ुख शिवाजी मोरे यांच्या वतीने शिबीर घेण्यात आले. या शिबिरास निवडणूक प्रमुख सतीश घाटगे, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे यांनी भेट दिली. प्रत्येक ठिकाणी रक्तदात्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा विधायक उपक्रम सेवा हीच संस्कृती या भाजपच्या विचारधारेचे जिवंत उदाहरण ठरला आहे. या शिबिरासाठी शहागड घनसावंगी आणि रांजणी मंडळातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. रक्तसंकलनासाठी जनकल्याण रक्तपेढी व लोकमान्य रक्तपेढीच्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. याबद्दल संपूर्ण टीमचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# रामेश्वर पवार यांचा स्पर्धा परीक्षा दृष्टिकोनातून प्रश्नसंच प्रकाशित

**जाफराबाद । प्रतिनिधी -** महादेव व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी ही शालेय अभ्यासक्रमावर आधारित असते, हे लक्षात घेऊन येवता येथील शिक्षक रामेश्वर पवार यांनी इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नसंच पुस्तिका तयार केली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लवकर व योग्य वयातच स्पर्धा परीक्षेची दिशादर्शक तयारी करता येणार आहे.

या प्रश्नसंचाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विषयातील प्रत्येक पाठावर आधारित ३० प्रश्नांची मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेनुसार विचारमूलक, अभ्यासपूर्ण व परीक्षाभिमुख प्रश्नांचा समावेश आहे.

या पुस्तिकेचे प्रकाशन माहोरा केंद्रात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकृष्ण चेके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख डी. के. सोनूने होते.

कार्यक्रमास अनिल गवई (मुख्याध्यापक, माहोरा), गणेश खडोळ (मुख्याध्यापक, पिंपळगाव), डॉ. राजेंद्र पवार, राधेश्याम ठेंग, संजय कासोद शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

युवा आदर्श

### साध्य ...

शांतीपूर्ण चर्चा विमर्श
विश्व बंधुत्वा स्वयंसिद्ध
निष्फळ प्रयास रे सारे
अंतिम पर्याय हा युध्द
युध्दनिर्णय सोपा नसे
हवेत विचारवंत प्रबुद्ध
तयारी विना रणी उतरे
पराजीत होती निर्बुद्ध
रक्षण करायचे देशाचे
सर्वचं आहो कटिबध्द
एकजूटीने लढा द्यावा
अंतर्बाह्य आज्ञा सिध्द
चुकाकरे घिसड घाईत
बुचकाळे दुष्मन उन्नद्ध
अध:पात स्वता करते
मस्तक गोंधळले क्रुद्ध
शस्त्र अस्त्र न् अन्नवस्त्र
असो मुबलक समृध्द
हतबल दशदिशा बनो
स्थिती समोरची विरुध्द
युध्द बंदी नसे अवधि
निर्धार किल्ला अभेद्य
विश्रांती नंतर मुळी न
हेतू होईतो पूर्ण साध्य

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# श्रीमती जे.बी.के. विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती जे.बी.के. विद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी दोष निवारण कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात एकूण ३५ विद्यार्थ्यांना चष्मे वितरित करण्यात आले. यामुळे वाचन-लेखन करताना आणि दैनंदिन कामकाजात येणाऱ्या दृष्टी संबंधित अडचणी दूर होणार असून, विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या अशा योजनांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वेळेवर आरोग्य सुविधा मिळणे शक्य होते, असे मतही अनेकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमार काळे, संस्थेचे संचालक प्रा. दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, तसेच ज्येष्ठ शिक्षक एस.बी. बोरकर, रमेश इंगळे, व्ही.के. जाधव, प्रा. सुनील बनसोडे, प्रा. कैलास जाधव, प्रा. रामदास भांगे, प्रा. गजानन धोटे, प्रा. डॉ. आनंद जाधव, क्रीडा मार्गदर्शक कैलास भूतेकर, बी.यु. ससाने, दिनकर उखर्डे, दत्ता उखर्डे, समाधान कांबळे, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, वासुदेव क्षिरसागर, राजेश शेवाळे, उज्ज्वला आवटी, एफ.ए. शेख, माधुरी पाटील, मंजुषा भिलावेकर, ज्योतीताई जाधव, विजया लंबे, राजू डोम ळे, नागोराव देशमुख, दगडुबा तांबेकर, दिपक देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारण्यासोबतच त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतही सकारात्मक बदल अपेक्षित आहे. अशा उपक्रमांची गरज ग्रामीण भागात अधिक प्रमाणात असून, शासनाने अशा योजना सातत्याने राबवाव्यात, अशी मागणीही काही पालकांनी केली.

# सोन्याचे दर १ हजार रुपयांनी वधारले

**नवी दिल्ली -** मंगळवारी राष्ट्रीय राजधानीतील सराफा बाजारात सोन्याच्या दरात तब्बल १,००० रुपयांची उसळी नोंदवण्यात आली. किस्ट (बुलियन ट्रेडर्स)कडून मोठ्या प्रमाणावर झालेल्या लिलावामुळे ही झपाट्याने वाढ झाली आहे. परिणामी, ९९.९% शुद्ध सोन्याचा दर रु १,००,०२० प्रति १० ग्रॅमवर पोहोचत, चार आठवड्यांचा उच्चांक गाठला आहे. सोमवारी ९९.९% सोन्याचा दर रु ९९,०२० इतका होता. दरम्यान, याआधी १९ जून २०२५ रोजी सोन्याने एक लाखाचा टप्पा पार केला होता.





